# कोल्हापूर जिल्हा परिषद कोल्हापूर
## स्थायी समिती सभा क्रं. ३४ सन २०२४-२०२५
## शुक्रवार दिनांक २०-०९-२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता
## स्थळ :- स्व. वसंतराव नाईक सभागृह, जिल्हा परिषद कोल्हापूर

=====================================================

**कार्यवृत्तात**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची स्थायी समिती सभा दिनांक २०-०९-२०२४ दुपारी २.०० वाजता मा.स्व. वसंतराव नाईक समिती सभागृह, जिल्हा परिषद कोल्हापूर येथे प्रत्यक्षात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

येणेप्रमाणे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी सभेस उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरूवात झाली.

**सचिव** :- सर्वाना नमस्कार, कोल्हापूर जिल्हा परिषदेची प्रशासक कालावधीतील स्थायी समिती सभा आज शुक्रवार दिनांक २०-०९-२०२४ इ. रोजी आयोजित केली आहे. आजच्या सभेसाठी उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे मा. श्री. कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासकसो, मा. अजयकुमार माने अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.श्रीम. सुषमा देसाई प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यो. कोल्हापूर तसेच संबधीत खाते प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक यांच्या मान्यतेने सभा कामकाजास सुरूवात करते.

**विषय क्रं. १** :- स्थायी समिती सभा दिनांक २२-०८-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे. (**सा.प्र.**)

**सचिव** :- सर्व खातेप्रमुखांना मागील आठवडयातच सदर सभेचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला आहे. याबाबत याबाबत कोणत्या विभागाची काही अडचण आहे का ?

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** :- कोणत्याही विभागाची सदर कार्यवृत्तांताबाबत काही आक्षेप नाही असे समजून कार्यवृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ठराव क्रंमाक :- ४८२** **दिनांक २०-०९-२०२४**

स्थायी समिती सभा दिनांक २२-०८-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली होती. सदर स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांचे सभागृहात वाचन करणेत येवून सर्वानुमते इतिवृत्त कायम करणेतबाबतचा ठराव पारित करणेत आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्रं. २** :- स्थायी समिती सभा दिनांक २२-०८-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेतील मंजूर ठरावावरील कार्यालयीन तजबीज जाहीर करणे. (**सा.प्र.**)

**सचिव** :- स्थायी समिती सभा दिनांक २२-०८-२०२४ इ. रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेतील मंजूर ठरावावरील कार्यालयीन तजबीज जाहीर करणेबाबत खालील प्रमाणे विषय आहेत.

**विषय क्रं. ३** :- सप्ताहामध्ये प्राप्त झालेल्या महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके वाचन करणे.

**विषय क्रं. ४** :- ग्रामपंचायत घोटवडे ता.पन्हाळा येथील बैठी दगडी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत (**ग्रामपंचायत**)

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)** :- ग्रामपंचायत घोटवडे ता.पन्हाळा येथील बैठी दगडी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जि.प.कोल्हापूर यांनी शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदरच्या विषयास जि.प. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस मिळावी ही विनंती.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** :- ठिक आहे. विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करणेच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रंमाक** :- **४८३** **दिनांक २०-०९-२०२४**

ग्रामपंचायत घोटवडे ता. पन्हाळा येथील येथील पिण्याच्या बैठी दगडी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु. जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे. ग्रामपंचायत घोटवडे ता. पन्हाळा येथील पिण्याच्या बैठी दगडी पाण्याची टाकी. निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत घोटवडे यांचेकडून पंचायत समिती पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याच्या टाकीचा असेसमेंट उतारा व न न २५ उतारा प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत घोटवडे ता. पन्हाळा यांनी मासिक सभा ठराव क्र ५४ दि. ०५ /१० /२०१८ व ग्रामसभा ठराव क्र ३८ दि. २०/०८/२०१८ ने सदर पाण्याची टाकी वापरात नसलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केला आहे. सन १९५६ मध्ये टाकी बांधली आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्र ३६ दि १२/०७/२०२४ ने निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट Outward No./SU/DOT/CIVIL/2375 दि. १६/०७/२०२४ ने सादर केलेला आहे

कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजीप/ग्रापापू /कावी८/८२२/२०२४ दि. २८/०८/२०२४ ने घोटवडे ता. पन्हाळा येथील पिण्याच्या बैठी दगडी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस केली आहे.

सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत घोटवडे ता. पन्हाळा विहित कार्यपद्धतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास हि सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्रं. ५** :- ग्रामपंचायत गजापूर ता. शाहूवाडी येथील समाज मंदिर निर्लेखन करणेबाबत (**ग्रामपंचायत**)

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)** :- ग्रामपंचायत गजापूर ता. शाहूवाडी येथील समाज मंदिर निर्लेखन करणेबाबतचा विषय असून सदरच्या विषयास यापूर्वीच्या सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेणेत आलेली आहे.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** :- ठिक आहे.

**आयत्यावेळेचे विषय**

**विषय क्रं. ६** :- माहे जुलै २०२४ ची जमा खर्चाची प्रपत्र मंजूरीबाबत (**वित्त**)

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी** :- माहे जुलै २०२४ मध्ये हस्तांतरण जमा तपशील रक्कम रु.२९८०१६२१९५/- असून खर्च रक्कम रुपये ८६९६९९८३७/- इतका आहे. अभिकरण योजना जमा रक्कम रु. ४६०८८६०/- असून खर्च रक्कम रुपये ४७४२४०११/- आहे. तसेच जि.प स्वनिधि जमा रक्कम रु.१५१८२२८४/- इतकी असून खर्च रक्कम रु.१३११११०३८/- इतका आहे. सामान्य प्रशासन विभाग खर्च ७.८२ टक्के, शिक्षण ६.६८ टक्के, बांधकाम २२.६२ टक्के, आरोग्य विभाग ५.३७ टक्के, पाणी पूरवठा विभाग ०.२ टक्के, कृषी - ० टक्के, पशुसंवर्धन विभाग-० टक्के, समाज कल्याण ० टक्के आहे. एकूण सर्व विभागांचा ३.४८ टक्के खर्च झाला आहे.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** :- ठिक आहे. मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रंमाक** :- **४८४** **दिनांक २०-०९-२०२४**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे जुलै २०२४ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करणेत आली असून वित्त समितीने ठराव क्रं. १४ दिनांक २८-०८-२०२४ ने केलेल्या शिफारशीसह त्यास मंजूरी देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक** :- आणखीन कोणत्या विभागाकडील विषय असलेस घ्यावेत विषय नसलेस सभा थांबवूया.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी** (सा.प्र.) **तथा सचिव** :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासकसो यांचे परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाली.

(मनीषा देसाई)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

(कार्तिकेयन एस.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**